
■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 74 ■ बुधवार,23 एप्रिल 2025 ■ RNI NO.-2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू. 5

दैनिक
# आरंभ मराठी

arambhmarathi535@gmail.com



## दोन एकर शेतामध्ये बहरला झेंडू; तरुण शेतकऱ्याचा प्रयोग



**रमेश नरवडे । आरंभ मराठी**

### कल्याणच्या बाजारात फुलांना मिळतोय चांगला दर; पाच लाख रुपयांचे उत्पन्न मिळण्याची अपेक्षा

**पळसप** : पारंपारिक शेती परवडत नसल्याने आणि शेतामध्ये नवीन काहीतरी आधुनिक पिके घेण्याच्या उद्देशाने बाजारपेठेचा अंदाज घेऊन औसा तालुक्यातील मासूर्डी येथील तरुण शेतकरी विनोद भास्कर शेळके यांनी आपल्या दोन एकर शेतामध्ये झेंडूची यशस्वी फुलशेती केली आहे. त्यातून त्यांना चांगले उत्पन्न मिळत आहे. शेळके यांची मासूर्डी येथे दहा एकर जमीन आहे. यामध्ये त्यांनी दोन एकर झेंडू पिका बरोबरच टोमॅटोचीही लागवड केली आहे. इतर काही पारंपरिक पिके आहेत. इतर पिकामध्ये खर्च वजा जाता काहीही शिल्लक राहत नसल्याने त्यांनी आधुनिक पध्दतीने शेतामध्ये नवीन प्रयोग करण्याचे ठरवले आणि त्यामधून त्यांनी ड्रीपच्या साह्याने दोन एकर क्षेत्रामध्ये फ ब्रुवारी महिन्यात नेत्रा कंपनीची अक्षता येलो या व्हरायटीची पंचवीस हजार रोपांची लागवड केली. त्याची योग्य देखभाल करून वेळच्या वेळेला खते, फवारणी, आळवणी , पाणी इत्यादीची देखभाल करून प्लॉट अतीशय जोमदार आणला. त्यामधून त्यांना चांगला नफा मिळत आहे. आज पर्यंत झेंडू फ ुलांचे दोन तोडे झाले असून त्यातून नऊ टन उत्पन्न मिळाले आहे. निघालेला माल सद्या ते कल्याण येथील बाजारपेठेत विक्रीसाठी घेऊन जातात. त्यांना सद्या चाळीस ते पंचेचाळीस रुपये किलो प्रमाणे दर मिळत आहे. यातून त्यांना साडेतीन ते चार लाख रु उत्पादन मिळाले आहे. आणखी या पिकातून चार ते पाच तोडे होतील त्यांमधून चालू दराप्रमाणे चार ते पाच लाख रुपये उत्पन्न मिळेल अशी अपेक्षा आहे. शेळके यांना आपल्या दोन एकर झेंडू लागवडीच्या पिकामधून खर्च वजा जाता पाच ते सहा लाख रुपये निव्वळ नफा मिळेल असा अंदाज आहे. यातून ते समाधानी असल्याचेही त्यांच्याकडून सांगण्यात आले. तरुण शेतकऱ्यांनीही पारंपरिक शेतीला बगल देऊन आपल्या शेतामध्ये नवनवीन प्रयोग करून आपली आर्थिक प्रगती करावी असा त्यांनी तरूण शेतकऱ्यांना संदेश या माध्यमातून दिला आहे.

# धाराशिव जिल्ह्यातील चार तालुक्यात ड्रग्जचे जाळे?

### बार्शी ड्रग्ज प्रकरणातील सहापैकी चार आरोपी परंड्याचे; उद्यापर्यंत पोलीस कोठडी
-------------
### परंड्याच्या मागील कारवाईवर संशयाची सुई

**आरंभ मराठी । धाराशिव**

**बार्शी – परंडा रस्त्यावर पकडण्यात आलेल्या ड्रग्ज प्रकरणातील सहा आरोपी पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्यापैकी चार आरोपी परंडा शहरातील असल्यामुळे या ड्रग्ज प्रकरणाची पाळेमुळे शोधण्याचे पोलिसांसमोर आव्हान निर्माण झाले आहे. धाराशिव जिल्ह्यातील चार तालुक्यात ड्रग्ज कनेक्शन पसरले असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. परंड्यातील चार आरोपी या प्रकरणात पकडल्यामुळे १६ महिन्यांपूर्वी परंड्यात पकडलेल्या ड्रग्जची चर्चा पुन्हा नव्याने सुरू झाली आहे. तसेच जुन्या प्रकरणातील कॅल्शियम क्लोराईड वर देखील शंका उपस्थित केली जात आहे. यातील सहा आरोपींना काल आणखी दोन दिवसांची कोठडी सुनावण्यात आली आहे. धाराशिव जिल्हा ड्रग्जचा हॉटस्पॉट तर झाला नाही ना अशी शंका व्यक्त केली जात आहे.**

सहा दिवसांपूर्वी बार्शी – परंडा रोडवर एका हॉटेलजवळ ड्रग्ज विक्री प्रकरणी बार्शी पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली होती. त्यातील दोन आरोपी परंडा येथील असल्याचे समोर आले होते. पुढील तपास करत असताना या टोळीतील नवीन तीन आरोपींना बार्शी पोलिसांनी सोमवारी (दि.२१) अटक केली आहे. त्यातील आणखी दोन आरोपी परंडा येथीलच असल्याचे समोर आल्यामुळे या प्रकरणात तुळजापूर प्रमाणेच परंडा शहरात ड्रग्ज रॅकेट सक्रिय आहे की काय अशी शंका उपस्थित केली जात आहे. यातील आरोपींना न्यायालयाने दोन दिवस पोलीस कोठडी दिली आहे.

या कारवाईत वसीम इसाक बेग (वय ३६, रा. परांडा), जावेद नवाबमुद्दीन मुजावर (वय ३६, रा. परांडा), जमीर अन्सार पटेल (वय २८ रा. गाडेगाव रोड बार्शी), असद हसन देहलूज (वय ३७, रा. परांडा), मेहफूज महंमद शेख (वय, १९ रा. बावची, ता. परांडा), सर्फराज अस्लम शेख (वय ३२, रा. काझी गल्ली, बार्शी) अशा सहा आरोपींना अटक केली आहे. पोलिसांनी दिनांक १७ एप्रिल रोजी बार्शी परांडा रोडवरील एका हॉटेलजवळ छापा टाकून तीन जणांकडून कारसह २०.४ ग्रॅमच्या अंमली पदार्थाची ९ पाकीटे, गावठी पिस्तूल, तीन जिवंत राउंड, रोख ८ हजार रुपये किमतीचे तीन मोबाइल असा १३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. हा तपास बार्शी पोलीस करत असले तरी आरोपी हे परंडा शहरातील असल्यामुळे परंडा पोलिसांना देखील याचा तपास करावा लागणार आहे. तुळजापूर ड्रग्ज प्रकरण समोर आल्यानंतर त्याचे परंडा कनेक्शन असल्याची शंका वारंवार उपस्थित केली जात होती. कारण, मागील वर्षी १९ जानेवारी २०२४ रोजी परंडा पोलिसांनी परंडा – देवगाव रोडवर ड्रग्ज सदृश्य पदार्थासह एका आरोपीला ताब्यात घेतले होते. त्यावेळी इम्रान नसीर शेख (वय–२९) याच्याकडून ८.३३ ग्रॅम पावडर पोलिसांनी जप्त केली होती. त्यावेळी ड्रग्जचा संशय व्यक्त करून पोलिसांनी इम्रान शेख याच्याविरोधात गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी ऑगस्ट २०२४ रोजी अन्वर उर्फ अण्णा जलील अत्तार (मुजावर गल्ली, परंडा) याला अटक केली होती. पोलिसांनी या गुन्ह्यात १२ साक्षीदार व इतर पुरावे हस्तगत केले मात्र वैज्ञानिक प्रयोगशाळेत पकडण्यात आलेली पावडर ड्रग्ज नसून कॅल्शियम क्लोराईड असल्याचे समोर आले आणि गुन्हा रद्द करण्याचा प्रस्ताव कोर्टात द्यावा लागला. बार्शी ड्रग्ज प्रकरणातील प्रमुख चार आरोपी परंडा शहरातील असल्यामुळे पोलिसांच्या जुन्या कारवाईवर शंका व्यक्त केली जात आहे. या प्रकरणात परंडा पोलिसांनी गांभीर्याने तपास करून ड्रग्जची पाळेमुळे खोदून काढावी अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे.



### चार तालुक्यात ड्रग्ज रॅकेट ?

धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर, परंडा, कळंब आणि धाराशिव या चार तालुक्यात ड्रग्जचे जाळे पसरले असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. तुळजापूर आणि परंडा येथे याचे थेट पुरावे आणि आरोपी मिळून आले असले तरी धाराशिव आणि कळंब तालुक्यात मात्र थेट पुरावे आणि आरोपी मिळून आलेले नाहीत. तुळजापूर ड्रग्ज प्रकरणात देखील धाराशिवचा उल्लेख वारंवार करण्यात आला आहे. त्यातच आता कळंबचा उल्लेख येत असल्यामुळे ड्रग्जची व्याप्ती वाढत असल्याचे दिसून येत आहे.

### परंडा येथील आरोपींचे मुंबई, पुणे कनेक्शन

बार्शी ड्रग्ज प्रकरणात परंडा येथील जे चार आरोपी हाती लागले आहेत त्यांचे पुणे आणि मुंबई येथे कनेक्शन असल्याने तुळजापूर प्रमाणे याही प्रकरणात पुणे, मुंबई येथील बडे मासे हाती लागण्याची शक्यता आहे. या प्रकरणात बार्शी आणि परंडा येथील पोलीस समन्वयाने काम करत असून, या ड्रग्ज प्रकरणाकडे धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## महावितरणच्या भोंगळ कारभारावर शेतकरी संतप्त

### कळंब येथील कार्यालयाला ठोकले टाळे



**आरंभ मराठी । कळंब**

कळंब तालुक्यातील आडसूळवाडी, आथर्डी आणि खोंदला या गावातील शेतकऱ्यांनी मंगळवारी (दि.२२) कळंब शहरातील महावितरणच्या कार्यालयावर धडक देत जोरदार आंदोलन केले. मागील कांही दिवसांपासून वीज पुरवठा अनियमित होत असल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी थेट महावितरण कार्यालयाला टाळे ठोकले. महावितरण कार्यालया समोरच या तीन गावातील शेतकऱ्यांनी ठिय्या आंदोलन सुरू केले. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार गेल्या ४८ तासात केवळ सहा तास वीज उपलब्ध झाली आहे. ही तर फक्त आज पर्यंतची परिस्थिती आहे परंतु, इतर दिवशीही अशीच परिस्थिती साधारण पाहायला मिळते. शेतीच्या कामकाजासाठी आणि पाण्याच्या पंपासाठी वीज अत्यंत गरजेची असताना वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे शेतकरी आर्थिक दृष्ट्या अडचणीत आले आहेत. गावांना सेवा देण्यात महावितरणचे अधिकारी सातत्याने दुर्लक्ष करत असतात. याचा निषेध नोंदवत आंदोलक शेतकऱ्यांनी मंगळवारी महावितरण कार्यालयात गर्दी केली. शेतकऱ्यांनी कर्मचाऱ्यांना बाहेर काढून महावितरण कार्यालयाच्या मुख्य दरवाजाला टाळे ठोकून तेथेच ठिय्या आंदोलन केले.

वीज पुरवठा सुरळीत झाला तरच कार्यालय उघडू असा ठाम पवित्रा आंदोलक शेतकऱ्यांनी घेतला. यावेळी महावितरण च्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. काही वेळासाठी परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांचा बंदोबस्त असूनही शेतकऱ्यांची आक्रमकता लक्षात घेता अधिकाऱ्यांनाही आंदोलनाची गंभीर दखल घ्यावी लागली. शेतकऱ्यांनी स्पष्ट केले की मागण्या पूर्ण होईपर्यंत हे आंदोलन मागे घेणार नाही. सद्यस्थितीत शेतीचा हंगाम सुरू आहे जर वेळेवर वीज मिळाली नाही तर पिकांचं नुकसान होणार आहे, त्यामुळे वीजपुरवठा सुरळीत करण्याचा निर्णय घेतल्याशिवाय आम्ही माघार घेणार नाही असे आंदोलक म्हणाले. दरम्यान या आंदोलनामुळे महावितरणाचे अधिकारी आणि स्थानिक प्रशासन हतबल झाल्याचे पहायला मिळाले.

## रेशन दुकानदारांच्या कमिशनमध्ये क्विंटलला २० रुपयांची वाढ

**आरंभ मराठी । धाराशिव**

गरीब कल्याण योजनेंतर्गत रेशन दुकानदारांमार्फत वाटप करण्यात आलेल्या योजनेतील धान्य वाटपासाठी सध्या प्रतिक्विंटल १५० रुपयांचे कमिशन दिले जाते. धाराशिव जिल्ह्यातील १०७८ दुकानदारांना वितरित होणाऱ्या मालाप्रमाणे हे कमिशन दुकानदारांच्या खात्यावर जमा केले जाते. हे कमिशन कमी असून यामध्ये वाढ करावी अशी मागणी रेशन दुकानदारांकडून मागील काही दिवसांपासून होत होती. दुकानदारांच्या या मागणीचा सरकारने सकारात्मक विचार करून यामध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री अजित पवार यांनी सोमवारी (दि.२०) रेशन दुकानदारांच्या कमिशनमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला. क्विंटलला २० रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे रेशन दुकानदारांना क्विंटलला १५० ऐवजी यापुढे १७० रुपये देण्यात येणार आहेत. या निर्णयाचा धाराशिव जिल्ह्यातील १०७८ रेशन दुकानदारांना फायदा होणार आहे. हे अनुदान दुकानदारांच्या थेट खात्यावर जमा करण्यात येणार आहे. कालच यासंबधीचा निर्णय घेण्यात आला असून, याची अंमलबजावणी मे महिन्यापासून होण्याची शक्यता आहे. दुकानदारांना मिळणाऱ्या पैशात जास्त वाढ केली नसली तरी या निर्णयामुळे दुकानदारांना काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे.

**धाराशिव जिल्ह्यातील रेशन दुकानदारांची संख्या**

भूम– ११२, धाराशिव–२०९, कळंब –१४३, लोहारा –७८, उमरगा– १५२, परंडा –११५, तुळजापूर–१९२, वाशी –७७ अशी असून एकूण १०७८ संख्या आहे.

## धाराशिवचे तापमान ४२.४ अंश सेल्सिअसवर

### काळजी घ्या, पुढील आठ दिवस उष्णतेची तीव्र लाट





**आरंभ मराठी । धाराशिव**

सध्या धाराशिव जिल्ह्यात ऊन्हाने उच्चांक गाठला असून, सोमवारी धाराशिवचे तापमान तापमान दुपारी ४२.२ अंशापर्यंत गेले होते. तर मंगळवारी त्यात वाढ होऊन तापमान ४२.४ अंश सेल्सिअसवर गेले होते. उष्णतेच्या या अतिशय तीव्र लाटेमुळे नागरिक होरपळून निघत असून, पशु, पक्षी आणि प्राण्यांनाही या तीव्र उष्णतेचा सामना करावा लागत आहे. आगामी आठवडाभर तापमानात आणखी वाढ होईल, असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला असून, तीन दिवस यलो अलर्ट जारी केला आहे. धाराशिव जिल्ह्यात यंदा ऊन्हाने नागरिकांना चांगलेच त्रस्त केले आहे. एप्रिल महिन्यातच धाराशिवचा पारा ४२ अंशावर गेला असून, मे महिन्यात तापमान ४५ अंशांपर्यंत जाईल अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. पण यंदा एप्रिल महिन्याच्याच दुस–या आठवड्यानंतर तापमानात प्रचंड वाढ झाली आहे. गेल्या तीन दिवसांपासून तापमानात लक्षणीय वाढ झाली. हवामान खात्याने २१ एप्रिल रोजी व्यक्त केलेल्या अंदाजानुसार जिल्ह्यात ३० एप्रिलपर्यंत उष्ण व दमट हवामान राहणार आहे. आठवड्याच्या अखेरीपर्यंत तापमान ४३ अंशाच्या पुढे जाण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर पुरेशे पाणी प्या, डॉक्टरांच्या सल्ल्यानंतर द्रवपदार्थ किंवा घरगुती लस्सी, भाताची पेज, लिंबूपाणी, नारळपाणी अशा प्रकारचा हलका आहार घ्या असे आवाहन करण्यात आले आहे. सैल आणि सुती कपडे वापरावेत, आवश्यक असेल तरच दुपारच्या वेळी घराच्या बाहेर पडावे, डोक्याला रुमाल, टोपी, डोळ्याच्या सुरक्षेसाठी चष्मा व ऊन्हापासून कातडीचा बचाव करायला सनस्क्रीन वापरावे, असे आवाहन करण्यात आले आहे. ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, आजारी व्यक्ती, स्थूल व्यक्ती, गरोदर महिला यांनी विशेष काळजी घेण्याची गरज आहे. येत्या ३० एप्रिल पर्यंत वातावरणात प्रचंड उष्णता निर्माण होईल असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केलेला आहे. या काळात काही प्रमाणात ढगाळ वातावरण निर्माण होऊन घामेघुम व्हावे लागणार आहे. तापमान वाढल्यामुळे दुपारच्या वेळेला रस्त्यावर शुकशुकाट दिसत असून, दुपारी बारा ते पाच पर्यंत रस्ते ओस पडत असल्याचे चित्र दिसत आहे.

## जागतिक पुस्तक दिन

आज २३ एप्रिल, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक पुस्तक दिन म्हणून साजरा केला जातो. विल्यम शेक्सपिअर, मिग्युअल सर्वांटीस, इंका गार्सीलोसो या जगातील ख्यातनाम व्यक्तींचा या दिवशी मृत्यू झाला त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी युनेस्कोने २३ एप्रिल हा दिवस जागतिक पुस्तक दिन म्हणून घोषित केला. हा दिवस पहिल्यांदा २३ एप्रिल १९२३ रोजी स्पेनमधील पुस्तक विक्रेत्यांनी साजरा केला. स्पेनमध्ये मिगेल डे सर्वांटीसच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा करण्यात आला. त्यानंतर १९९५ मध्ये पॅरिसमध्ये युनिस्कोची सर्वसाधारण सभा झाली ज्यात जगभरातील लेखकांना आदर आणि श्रद्धांजली वाहण्यासाठी आणि पुस्तकांमध्ये रस निर्माण करण्यासाठी जागतिक पुस्तक दिन प्रत्येक वर्षी साजरा केला जाईल असा निर्णय घेण्यात आला. वाचन संस्कृतीच्या चर्चेविना पुस्तक दिन साजरा होऊच शकत नाही चला तर मग वाचन संस्कृती विषयी चर्चा करू आणि पुस्तक दिन साजरा करू. आजच्या मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थ्यांचे वाचन कमी होत चालले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांमध्ये जशी वाचनाची आवड होती तशी आवड आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. आजच्या सोशल मीडिया आणि इंटरनेटच्या युगात पुस्तके वाचण्याचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी कमी होत चालली आहे. साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे. पूर्वी गजबजणारी वाचनालये आता ओस पडू लागली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके वर्षानुवर्षे एका जागेवरून हलत नाही. आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरत चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी पुस्तक दिनासारख्या उपक्रमांचे आयोजन व्हायला हवे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो. ज्ञान मिळवण्याचे प्रभावी साधन म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्यावर आपली ग्रहण क्षमता आणि स्मरणशक्ती अधिकाधीक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधीक प्रगल्भ होते त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. चांगलं वाचल्यावर आणि चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात, त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते. आपली भाषा तसेच वक्तृत्व विकसित होते. वाचनामुळे आपले व्यक्तिमत्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे. मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन कायमचा बदलून जातो. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या तरुणांना खूप ताण असतो हा ताण कमी करण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे वाचन. डॉ बाबासाहेब आंबेडकर नेहमी म्हणत पुस्तकाने अशक्त मस्तक सशक्त होते आणि सशक्त मस्तक कोणासमोरही डोळे झाकून नतमस्तक होत नसते. स्वामी विवेकानंद, महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, भगतसिंग यासारख्या महापुरुषांच्या जीवनाला वाचनामुळेच कलाटणी मिळाली. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा कादंबरी यामुळे वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो. काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्र वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. एकूणच वाचनामुळे माणूस सर्वगुणसंपन्न होतो. त्यांच्यात नैतिक मूल्यांची रुजवण होते. आज वाचनाअभावी समाजातून नैतिक मूल्ये हरवत चालली आहे. त्यामुळे नव्या पिढीने पुन्हा एकदा वाचन संस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे. आपल्या आणि समाजाच्या भल्यासाठी वाचन संस्कृती टिकवायलाच हवी. वाचाल तर वाचाल या उक्तीप्रमाणे तरुण पिढीला वाचवायचे असेल तर त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवायलाच हवे, त्यासाठी पुस्तक दिनासारखे उपक्रम नक्कीच फायदेशीर ठरतील.

दैनिक आरंभ मराठी
जागतिक पुस्तक दिन विशेष

# वाचाल तर वाचाल...

२३ एप्रिल हा दिवस जगभरात पुस्तक आणि कॉपीराइट दिवस म्हणून साजरा होतो. नागरिकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे व जगभरातील लेखक आणि पुस्तकांचा सन्मान करणे हे या दिवसाचं खास उद्दिष्ट आहे.विल्यम शेक्सपिअर, इंका गार्सिलोसा यासारख्या काही जगप्रसिद्ध व्यक्तींचं निधन २३ एप्रिल याच दिवशी झालं. त्यामुळे या दिग्गजांना श्रद्धांजली वाहण्यासाठी युनेस्कोने २३ एप्रिल हा दिवस जागतिक पुस्तक दिन साजरा करण्याची घोषणा केली. हा दिवस प्रथम २३ एप्रिल १९२३ मध्ये स्पेनमधील पुस्तक विक्रेत्यांनी साजरा केला होता. त्यानंतर १९९५ मध्ये पॅरिसमध्ये घेण्यात आलेल्या युनेस्कोच्या सर्वसाधारण सभेमध्ये जगभरातील लेखकांप्रती आदर व्यक्त करण्यासाठी व नागरिकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी हा दिवस साजरा केला जाईल,असा निर्णय घेण्यात आला.हा दिवस सांस्कृतिक आणि सामाजिक प्रगतीमध्ये लेखकांच्या योगदानाची देखील दखल घेतो. शिक्षण, संवाद आणि सांस्कृतिक समज वाढवण्यात पुस्तकं महत्त्वाची भूमिका बजावतात याची जाणीव करून देण्यासाठी हा दिवस खूप महत्त्वाचा आहे.२०२५ च्या पुस्तक दिनाची थीम तुमच्या पद्धतीने वाचा अशी आहे. प्रत्येकाची वाचनाची पद्धत वेगळी असते. मुले तर झोपून, लोळत-लोळत, चालत, फिरत वाचत असतात. मोठी माणसं देखील कोणी मनातल्या मनात, तर कोणी पुट पुटत वाचत असतं. वाचनामुळे आपली शब्दसंपत्ती वाढते. असं म्हणतात, वाचनानं मस्तक सुधारतं आणि ते कोणासमोर ही नतमस्तक होत नाही. म्हणजेच वाचनाने व्यक्तीमध्ये बुद्धिमत्ता, कौशल्य,सदसदविवेक बुद्धी, चिकित्सकृती आणि स्वाभिमान जागृत होतो. अंधश्रद्धा दूर होऊन वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागतो. वाचनाच्या आवडीतून लेखन कौशल्य विकसित होते. साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे नवीन लेखकांसाठी मूलमंत्र देताना लिहिता, मी फार वाचतो. कारण वाचन हे लेखकाच्या उद्योगाला पोषक असते. ते जर नसेल, तर चांगली साहित्य निर्मिती शक्य नाही. हे खर आहे आजच्या घडीला, जे अफाट वाचत आहेत,ते लिहीत नाहीत आणि जे लिहीत आहेत ते वाचत नाहीत. अशी दारुण अवस्था साहित्य क्षेत्रात झाली आहे. त्यामुळे सकस, दर्जेदार, तार्किक, वाचनीय आणि अभ्यासू लेखन वाचायला मिळत नाही. नुसती कथनशैली लिखाणात आहे म्हणून लिखाण करण्यापेक्षा चौफेर वाचनानंतर लिखाण केले पाहिजे. ज्याप्रमाणे शेतकरी आपल्या शेताची पेरणीपूर्वी मशागत करतो त्याचप्रमाणे लेखकाने ही आपल्या लिखाणाचे भरघोस पीक घेण्यापूर्वी, वाचन करून आपल्या बुद्धीची मशागत केली पाहिजे.

सकस, दर्जेदार ग्रंथांच्या वाचनातून आपण स्वतःला घडवत असतो. ग्रंथ वाचनातून आपल्याला आत्मविश्वास, जीवन जगण्याचा आशावाद, लढण्याची उमेद अशा अनेक गोष्टी मिळत असतात. असं म्हणतात, '' तुमच्याकडे दहा रुपये असतील, तर आठ रुपये स्वतःच्या खर्चासाठी ठेवा. उरलेल्या दोन रुपयांपैकी एक रुपयाचं गुलाबाचं फुल घ्या ; आणि एक रुपयांचं पुस्तक घ्या. का जगायचं? ते गुलाबाकडे पाहून कळेल. कसं जगायचं? ते पुस्तक शिकवेल. '' पुस्तकं पाठीवरती हात ठेवून लढ म्हणत असतात. म्हणून आपण सतत वाचलं पाहिजे. आपल्या पुढच्या पिढीला संपत्ती देण्यापेक्षा पुस्तके द्यावीत. कारण संपत्ती मिळालेली पिढी पंगू होते, तर पुस्तके मिळालेली पिढी सक्षम बनते.

पुस्तकांचे महत्त्व अधोरेखित करणारी पाब्लो नेरुडाची कविता आहे,

If you do not travel,
If you do not read,
If you do not listen to the sounds of life,
You start dying slowl एवढे महत्व पुस्तक वाचनाचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर,भगतसिंग अशी महान व्यक्तिमत्वे ग्रंथ वाचनातूनच घडली. भगतसिंग यांची वाचनाची आवड इतकी प्रचंड होती, की त्यांनी आयुष्यभर पुस्तकांवर प्रेम केलेच पण शहीद होतांना सुद्धा ते वाचतच होते. भगतसिंग यांना फाशी देण्याच्या दोन दिवस आधी त्यांचे वकील प्राणनाथ मेहता त्यांना भेटायला गेले. त्यावेळी त्यांनी वकिलांकडे लेनिनच्या चरित्राची मागणी केली. अंतिम दिवशी जेलर त्यांना बोलवायला आले तेव्हा भगतसिंगांच्या हातात लेनिनचेचरित्र होते.चला म्हटल्यावर ''ठहरो एक क्रांतिकारक की दुसरे क्रांतिकारकसे मुलाखत हो रही है'' असं म्हणून त्यांनी पुस्तकाची शेवटचे पान संपवली आणि कोठडीतून बाहेर पडले. वाचनातून लढण्यास बळ कसं मिळतं हेच भगतसिंगांच्या या जीवनातील प्रसंगातून ध्यानात येतं. वाचनातून कणखरपणा येतो. कणखर माणसं जीवनातील कोणत्याही संकटाला घाबरत नाहीत. संकट प्रसंगी गर्भगळीत होत नाहीत.वाचनाने एक परिपूर्ण व्यक्तिमत्व घडते. आपण ज्या प्रकारची पुस्तकं वाचतो त्या प्रकारे आपण घडत जातो. म्हणून दर्जेदार पुस्तक वाचनाची सवय आपण स्वतःला लावून घेतली पाहिजे. थोर व्यक्तींची जीवन चरित्रे, त्यांचा संघर्ष, त्यांची आत्मचरित्रे आपण वाचली पाहिजेत. देशाचा, जगाचा आणि आपल्या स्थानिक प्रदेशाचा इतिहास आपण वाचून काढला पाहिजे. शास्त्रज्ञांची चरित्रे आणि त्यांनी लावलेले शोध आणि विज्ञान, तंत्रज्ञान, पर्यावरणावरील पुस्तके आपण हमखास वाचली पाहिजेत. आपली प्राकृतिक रचना, हवामान, नद्या, धरणे आणि नैसर्गिक साधनसंपत्ती याबद्दलची माहिती देणारी पुस्तके आपण वाचली पाहिजेत.



किशोर जाधव
मो. ९९२२८८२५४१
सोलापूर


आपल्या लहान मुलांना छोटी छोटी गोष्टीचे पुस्तके आणि चंपक, चांदोबा, हितोपदेश , तेनाली राम यांसारखी प्रसिद्ध मासिके वाचायला दिली पाहिजेत. याच्यातून त्यांना वाचनाची गोडी लागेल.

आज सोशल मीडियाच्या काळात वाचन कमी झाले आहे. तरुण वर्ग रील, मोबाईल गेम्स याच्यामध्ये आपला फार मोठा किंमती वेळ वाया घालवत आहे. तरुणांना पुस्तक वाचनाकडे वळवण्यासाठी जाणीवपूर्वक काही उपक्रम हाती घेतले पाहिजेत. भीमाबाई जोंधळे नाशिकजवळ आजीचं पुस्तकाचं हॉटेल चालवतात, जे खाद्यसंस्कृतीला वाचनसंस्कृतीची जोड देणारा एक अनोखा उपक्रम ठरत आहे. आजीच्या या उपक्रमाची महाराष्ट्र शासनाने दखल घेऊन त्यांना मंगेश पाडगावकर भाषा संवर्धक पुरस्कार आणि मराठी भाषा गौरव पुरस्कार यांसारख्या पुरस्कारांनी गौरवलं आहे. आज मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. आपल्या भाषेच्या संवर्धनासाठी शासन प्रयत्न करत आहे. परंतु सामान्य मराठी जणांनी आपल्या भाषेचे संवर्धन करण्यासाठी नवनवीन मराठी लेखकांची पुस्तके विकत घेतली पाहिजेत अथवा ग्रंथालयातून घेऊन वाचली पाहिजेत. शेवटी आजच्या पुस्तक दिना दिवशी वाचाल तर वाचाल हा जयघोष देत, जागरूक समाज निर्मितीसाठी वाचन चळवळ उभी करण्याची आपण सारे प्रतिज्ञा करूया

# वाचक- रसिकांच्या मनावर राज्य करणारा 'एकलव्य'

फेसबुक वर लाईव्ह मध्ये वाचक संवाद ह्या उदगीच्या कार्यक्रमात बारा वर्षीय छोट्या शौर्य पैके ला एकलव्य पुस्तकावर बोलतांना पाहिलं आणि विचारात पडली! महाभारताचं हे पात्र फारच कमी जाणून आहोत वाटलं. पण हा छोटा मुलगा किती आत्मविश्वासाने बोलतोय वाटत होत! इथेच एकलव्य पुस्तकाचा शोध सुरू झाला. ॲमेझॉन वर एकच प्रत दाखवत होते. आणि ते बुक करण्यापुर्वी संपले! थोड्या दिवसांनी परत पाहिले तर पुस्तक उपलब्ध होतं. पण माझी एम. ए .मराठी ची मुक्त विद्यापीठाची परिक्षा होती! परत वाचू म्हणत पुस्तक वाचण लांबल! उदगीर साहित्य संमेलनात उदगीर वाचक अर्चना पैके ची भेट झाली आणि छोटा शौर्य पैके त्यांचा मुलगा आहे समजल! एकलव्य वाचायचं आहे जाणून घ्यायच आहे हे समजताच त्यांनी मला एकलव्य चक्क भेट म्हणून दिलं. ज्या पुस्तकासाठी मी वर्षभर वाट पाहत होते ते पुस्तक नकळत अचानक हातामध्ये पडले आणि अत्यंत आनंद झाला! घरची कामं करत मी एकलव्य वाचन सुरू केले! एकलव्यासोबतचा हा वाचन प्रवास मला खुप प्रेरक ठरला! विचारांची मालिका सुरू झाली, क्षणा क्षणाला जगण्यातील सत्यता जाणवत होती. जणू अचानक खुप परिपक्व होत होते मी! पुस्तकाचा इतका सुंदर प्रवास मला प्रथमच अनुभवयास मिळाला! खंत एकच एकलव्य विद्यार्थी दशेत वाचला असता तर आयुष्याची दिशा नक्कीच बदलली असती.लहानपणी एकलव्य म्हणजे आपल्या गुरूला गुरुदक्षिणा म्हणून अंगठा देणारा एवढेच परिचित होतं.पण खरा एकलव्य आज कळाला. असा तो एकलव्य वाचक रसिकांच्या मनावर राज करणारा. त्याची जिद्द ,आत्मविश्वास, गुरुप्रती एकनिष्ठा हे सारे गुण वाखण्याजोगे आहेत.

लेखक विजय देवडे सरांनी उत्कृष्ट एकलव्य दिला , मनापासून आभार! या समाजापुढे एकलव्याला आणले. आजच्या विद्यार्थ्यांना एकलव्य वाचण्याची जाणण्याची नितांत गरज आहे. एकलव्याच्या जीवनात येणारे प्रत्येक जण एक प्रेरणादायी संदेश देऊन गेले. आणि एकलव्य आपल्यासाठी एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व ठरले.




प्रत्येक गोष्टीकडे सतत उत्सुकतेने पाहणारा एकलव्य युद्धविद्या धनुर्विद्या संपादन करू लागला. हिरण्य धनु म्हणजेच एकलव्याचे वडील निषाध राजा. एकलव्याच्या प्रत्येक निर्णयात ठामपणे पाठीशी उभे राहणारे त्याचे वडील आणि त्याची आई रत्नगर्भा .पालक कसे असावेत ह्याचे सर्वोत्कृष्ट उदाहरण वाटले मला. एकलव्याच सर्वश्रेष्ठ धनुर्धार होण्याचा निर्णय राजाला अस्वस्थ करून गेला. कारण एकलव्याला विद्या शिकायची होती ती द्रोणाचार्याकडूनच पण त्या कोवळ्या जीवाला काय माहिती आर्य आणि अनार्य भेद. या एकाच गोष्टीची चिंता राजामधिल पित्याला वाटत होती.

एकलव्याला मोरपीस खूप आवडायचा पण राजाने मोरपिसा ऐवजी गुरुडपीस का खोचतो हे खूप छान समजावून सांगितले .आकाशात उंच उडणारा पक्षी .त्याची तीक्ष्ण नजर, भक्षाचा शोध. त्याच लक्ष नेहमी एकाग्र. तो आयती मृत शिकार खात नाही. आणि एकलव्य मोरपिस उशीखाली घेऊन झोपू लागला. बालकांना अनुभवातूनच शिक्षण दिले पाहिजे ही शिकवण खरी ठरते!.

एकलव्याचा अंगठा दिलेल्या बातमीने महाराज आजारी पडले आणि रत्नगर्भाची ही काळजी वाढली. पुत्राच्या काळजीने राणी रत्न गर्भा व्याकुळ झाली आणि तिला एकलव्याच्या बालपणीच्या आठवणी जाग्या झाल्या .पावसाळ्यात वीज कडाडले की एकलव्य घाबरायचा आणि म्हणायचा आई ग तू सोबत चल त्या चमकणाऱ्या वस्तूला घेऊन येऊ. किती ते धैर्य ! एकलव्याची काळजी वाटू लागली .म्हणून एकलव्याकडे भीलसेन एकलव्याचा बालमित्र आणि त्याच्यासोबत विशालकेतू भगीरथ, सुहास या तिघांना एकलव्याकडे पाठवण्यात आले. द्रोणाचार्य यांनी कौरव पांडवांना आणि इतर शिष्यांना घोडेवर हत्तीवर रथावर जमिनीवर धनुर्विद्या कौशल शिकवलं .गदायुद्ध ,खडंग तोमर अशा सर्व शस्त्राचा कौशल्य त्या शिष्याने आत्मसात केले. त्याच आश्रमात एकलव्य आला. पण तिथे आल्यानंतर त्यांना अशी माहिती मिळाली की द्रोणाचार्य केवळ आर्यांनाच युद्ध शास्त्राचा आणि धर्मशास्त्राचे ज्ञान देतात. द्रोणाचार्य ची वाट पाहत असतानाच अश्वत्थामा एकलव्याची भेट झाली. आणि ते थोड्याच अवधीत एकमेकांचे चांगले मित्र होऊन गेले.

द्रोणाचार्य आणि एकलव्याची भेट झाली. एकलव्याने द्रोणाचार्य कडून धनुर्विद्या आणि धर्मशास्त्रविद्या शिकण्याची परवानगी मागितली. पण द्रोणाचार्यनी ती नाकारली .कारण एकलव्य हा ब्राह्मण ही नव्हता आणि आर्यही नव्हता तो एक निषाध राजा होता. खूप विनवण्या करूनही द्रोणाचार्यांनी त्याला विद्या देण्यास नकार दिला.हा घाव एकलव्यास अनपेक्षित होता. निषाध हा सुध्दा सर्वसामान्य माणूसच असतो! सर्वात मोठा गुरु निसर्ग आहे तो माणसांमध्ये भेद करत नाही मग तुम्ही का?? पाणी देताना धारा माणसाचं कुळ विचारत नाही., अग्नी ऊब देताना कुळ विचारत नाही. मग तुम्ही का भेद करताय??? द्रोणाचार्यांनी जायला सांगितल्यावर एकलव्य निघाला परंतु त्याच्या मनात विचार बोलत होते शिष्य म्हणून मी माझे प्राणही अर्पण केले असते परंतु स्वाभिमानाची तडजोड शक्य नाही. लाचारीने मिळवलेल्या ज्ञान स्वाभिमान देईल का? हा प्रश्न त्याच्या मनात उभा राहिला. मला धनुर्विद्याही माझ्या राज्याच्या रक्षणासाठी शिकायची आहे.

एकलव्याची धनुर्विद्या पाहून द्रोणाच्या मनात वेगवेगळ्या प्रश्नांनी थैमान घातलं. त्याची अतुलनीय धनुर्विद्या पाहून द्रोणाचार्य अचंबित झाले. त्यांनी नकार दिल्यावर ही एकलव्य त्याच अरण्यात द्रोणाचार्य यांचा पुतळा तयार करून आपली धनुर्विद्या ग्रहण करत होता. तुझे गुरु कोण म्हटल्यानंतर एकलव्याने उत्तर दिले आपण गुरुदेव! .अर्जुनाला दिलेल्या वचनासाठी गुरुदेवांनी एकलव्याची गुरुदक्षिणा म्हणून उजव्या हाताचा अंगठा मागितला आणि तो त्याने सहजपणे देऊन टाकला. यावर गुरुदेव बोलतात वत्सा तू जे केलं ते न भूतो न भविष्यती असा आहे हे कोणीच करू शकणार नाही. तुझी ही विद्येची ओढ तुझीही एकाग्रता तुझी गुरु बद्दलची आस्था तू दिलेली गुरुदक्षिणा ऐकवली जाईल. तुला माझी सर्व धनुर्विद्या मिळो. माझं सर्व ज्ञान तुझं होईल .माझे आशीर्वाद सदैव तुझ्या सोबत आहेत. महादेव सदैव पाठीशी राहो.



सौ.सारिका देशमुख
मो. ९३०७२ ५६०७८
धाराशिव

भीलसेन एकलव्याचा बालमित्र. भिलसेना सारखा मित्र जो आयुष्यात येणाऱ्या अडचणीवर मात करायला शिकवतो. आत्मविश्वास जागा करतो. भिलसेनेचा वाक्य मनावर राज करून जातात. विचारांना नदीच्या प्रवाहाप्रमाणे वाहू दे . डबक्यात साठवून राहिलेल्या पाण्याचा वास येत असतो .विचाराचाही तसंच आहे विचार साचत राहिले तर ते माणसास आतून पोखरून टाकतात. वरून धडधाकट दिसणारा माणूस आतून घायाळ होत असतो .अशा प्रकारे समजावत त्याने एकलव्याचे मन परिवर्तन केले आणि सराव करण्यास भाग पाडले. भिलसेना सारखा मित्र जर आयुष्यात असेल तर कधीच मित्राच्या ओंजळी ह्या रिकाम्या राहणार नाहीत. तर त्या सदैव सुखाने भरलेल्या राहतील. मनामध्ये आत्मविश्वास जागवत राहतील. यशाकडे जाण्यासाठी धैर्याने वाट शोधून देऊन प्रोत्साहन देण्यासाठी सदैव तत्पर राहतील.

यादवावर केलेल्या हल्ल्यामध्ये जेव्हा कृष्ण एकलव्याच्या समोर येतो तेव्हा त्यांच्यातील संवाद हा मन खिन्न करणारा आहे. एकलव्य कृष्णाला विचारत असतो तु जे वागला ते अनितीने वागला. इथे एक गोष्ट खटकते की कृष्णाला आपण देव मानतो म्हणजे देवाची ही एक चांगली आणि एक वाईट बाजू असू शकते हा थोडा संभ्रमच वाटतो. निष्पाप निषधांना मारणं जरासंधाची हत्या ,यज्ञाच्या पवित्र ठिकाणी शिशुपालाची हत्या. खरंच हे नीतीचे पालन आहे का ??हा एकलव्याला पडलेला मोठा प्रश्न. कृष्णाचाही एकलव्या पुढे आत्मविश्वास थोडाफार तरी डगमगला होता. तो एकलव्याच्या बोलण्याने भांबावून गेला. कृष्णाने एकलव्याला मारण्यासाठी शेवटी अनितीचाच वापर केला. एकलव्याने निःशस्त्र कृतवर्मावर बाण चालवला नाही या गोष्टीचे कृष्णाला खरंच आश्चर्य वाटले. समाजातील कुळ भेदामुळे दूर ढकलला गेलेला एकलव्य तरीही परिस्थितीवर मात करून धनुर्विद्येत प्राविण्य मिळवणारा हा योद्धा यादवी सैन्यावर पळून जाण्याची वेळ आणणारा हा पहिलाच योद्धा...,,ज्याला साक्षात श्रीकृष्णाकडून मृत्यू मिळाला! मला श्रीकृष्ण आणि एकलव्याचे युध्द प्रसंगातील वाक्य शब्द कोरुन ठेवावे वाटले! विशेषतः भिलसेन चे माझा राजाच राहिला नाही हे एकलव्य मृत्यू नंतरचे उद्गार सदगदित करुन गेले. महान योध्दा , उत्कृष्ट धर्धुधर एकलव्य हा काळजाला भिडणारा विषय आहे. एकलव्य घरा घरात समजला पाहिजे, मुलांची ध्येय साकारण्यासाठी लागणारी सचोटी एकलव्या मार्फत सर्वत्र पेरली पाहिजे! हा बाणेदार बाणा सहजपणे विध्यार्थी दशेत अंगिकारला पाहिजे! सतवृत्ती आणि सातत्यपुर्वक परिश्रमाची घनघोर स्पर्धा म्हणजेच एकलव्य !

# येणाऱ्या काळात पुस्तकेच माणसाला तारतील

आजच्या या धावपळीच्या व धक्काधक्कीच्या जीवनात मनाला शांतता ,समाधान,आनंद आणि स्थैर्य हवे असेल तर पुस्तकासारखा दुसरा मित्र नाही. संकटाच्या काळात तुमचा एखादा मित्र तुमची साथ सोडेल, तुम्हाला सोडून जाईल, तुमच्याकडे दुर्लक्ष करेल पण पुस्तकासारखा मित्र तुम्हाला संकटातून बाहेर पडण्याचा मार्ग दाखवेल आणि जीवनाला नवी दिशा देईल. पुस्तक कोणतेही असो मग ते ऐतिहासिक, भौगोलिक, चरित्रात्मक, कादंबरी, कवितासंग्रह,आत्मकथनात्मक, प्रवासवर्णनात्मक, संदर्भग्रंथ असेल आपल्या ज्ञानात भर घालतात. आपल्याला समृद्ध करतात.

आजपर्यंत ज्यांनी ज्यांनी पुस्तकांना आपले मित्र केले त्यांच्या आयुष्याचे सोने झाले. अशी माणसे ज्ञानी,विद्वान झाली. पुस्तकांमुळेच त्यांच्या आयुष्याला वळण मिळाले.समाजात त्यांची मान उंचावली.प्रतिष्ठा प्राप्त झाली.म्हणून आपल्या जीवनात पुस्तकांना खूप महत्व आहे.

ज्यावेळी वाटतं आपलं सगळं संपलं आहे, अशावेळी पुस्तकातील एखादी ओळ तुमच्या मनावर असा काही प्रभाव पाडून जाते की तुमचं मन निराशेच्या गर्तेतून बाहेर पडते. जीवनाकडे बघण्याचा एक नवा दृष्टिकोन सापडतो.आणि माणूस सकारात्मकतेने पुन्हा नव्याने उभारी घेतो.आनंदाने आयुष्य जगायला शिकतो.इतकी मोठी ताकद पुस्तकात आहे.

चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही काळात पुस्तके माणसाला साथ देतात. जगण्याचे तत्वज्ञान सांगतात. तुम्हाला आनंदी ठेवतात.राग,त्रागा,दु:ख,द्वेषमत्सर,हेवा,तिरस्कार या सगळ्यातून बाहेर पडण्याचे ज्ञान विविध ग्रंथ देतात.

सोशल मिडियाच्या आहारी गेलेला समाज पुस्तकांकडे दुर्लक्ष करतो हे खेदाने नमूद करावे लागते.पुस्तके वाचायला वेळ मिळत नाही अशी कारणे ऐकायला मिळतात. येणाऱ्या पिढ्यांना जर आपल्याला समृद्ध करायचे असेल तर पुस्तकांशी मैत्री करायला शिकवा.येणाऱ्या काळात पुस्तकेच माणसाला तारणार आहेत हे तितकेच खरे आहे.

या विश्वातील ज्ञानाचा खजिना म्हणजे पुस्तके होय. पुस्तकांना मित्र केले तर आयुष्य सुंदर होईलच त्याचबरोबर या जगात ताठ मानेने जगण्याचा आत्मविश्वास आणि बळ पुस्तकांमुळे मिळेल. पुस्तके तुम्हाला संवेदनशील तसेच कणखर बनवितात. पुस्तकांमुळे ख-या अर्थाने तुम्ही माणूस बनता. म्हणूनच पुस्तके माणसाच्या आयुष्यात दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक असतात.

**लक्ष्मण जगताप**
बारामती, पुणे.

# अभिमन्यू पवार यांना महाराष्ट्र उद्योग गौरव पुरस्कार

## पुण्यात सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते सन्मान

**आरंभ मराठी । उमरगा**

तालुक्यातील नाईचाकूर गावचे भूमिपुत्र आणि पुणे येथील नामवंत उद्योजक अभिमन्यू पवार यांना केपीएम मीडिया हाऊस तर्फे दिला जाणारा 'महाराष्ट्र उद्योग गौरव पुरस्कार २०२५' नुकताच प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचा गौरव सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते पुणे येथे रविवारी (ता.२०) रोजी एका भव्य सोहळ्यात करण्यात आला. अभिमन्यू पवार यांनी सुमारे २५ वर्षांपूर्वी केवळ ३० रुपयांसह पुणे गाठले होते. आज मात्र त्यांच्या कर्तृत्वाच्या आणि समाजाभिमुख विचारसरणीच्या जोरावर त्यांनी कन्स्ट्रक्शन (गुत्तेदारी) क्षेत्रात स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. देशातच नव्हे तर जागतिक पातळीवर ओळख निर्माण करणाऱ्या रतन टाटा यांच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार मिळवणे, ही केवळ वैयक्तिक सन्मानाची बाब नसून उमरगा तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा ठरली आहे.

पुण्यासारख्या स्पर्धात्मक आणि औद्योगिकदृष्ट्या समृद्ध शहरात, आपल्या कल्पकतेच्या, चिकाटीच्या आणि प्रामाणिकतेच्या जोरावर अभिमन्यू पवार यांनी कंस्ट्रक्शन क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली. मात्र केवळ व्यवसायिक यशात रमून न राहता, त्यांनी ''उत्पन्नात जितका आपला हक्क, तितकाच समाजाचा'' या तत्त्वावर चालत




गरजू विद्यार्थी, सामाजिक संस्था आणि विविध उपक्रमांना नियमित मदत केली आहे. वारकरी संप्रदायाचा वारसा लाभलेले अभिमन्यू पवार राष्ट्रसंत तुकोबारायांच्या ''बुडती हे जग न देखावे डोळा'' या अभंगवचनानुसार कार्यशील जीवन जगत आहेत. पुण्यात वास्तव्यास असूनही, आजही आपल्या गावाशी नाळ जोडलेली ठेवत, प्रत्येक कार्यक्रमात सहभाग घेतात आणि मातीतला गंध जपतात.

केपीएम मीडिया हाऊसतर्फे दिला जाणारा महाराष्ट्र उद्योग गौरव पुरस्कार फक्त व्यवसायिक यशासाठी नाही, तर सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या उद्योजकांचा गौरव करण्यासाठी दिला जातो. रतन टाटा यांच्या समाजहिताच्या कार्यातून प्रेरणा घेऊन, 'शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या उद्योजकांना' या माध्यमातून सन्मानित करण्यात येते. अभिमन्यू पवार यांच्या या यशाने संपूर्ण उमरगा तालुक्यात आनंदाचं आणि अभिमानाचं वातावरण आहे. गावकऱ्यांपासून ते तालुक्यातील नेते, अधिकारी आणि सर्वसामान्यांपर्यंत सर्वांनी या सन्मानाबद्दल त्यांचं अभिनंदन केलं आहे.

# भूजल पातळीच्या वाढीसाठी जलतारा योजनेचा लाभ घेण्याचे तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांचे आवाहन

**आरंभ मराठी । धाराशिव**

महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १३ सप्टेंबर २०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत प्रत्येक एकर शेतजमिनीमागे एक जलतारा तयार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या योजनेचा मुख्य उद्देश पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत जिरवणे आणि भूजल पातळी वाढवणे हा आहे. या योजनेतून 'हर खेत को पानी' आणि ' , ' या संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यात येणार आहेत. एक एकर क्षेत्रात पडणारा पाऊस जलतारामध्ये साठवून जमिनीत झिरपविला जाईल, ज्यामुळे पाणीटंचाईवर मात करता येणार आहे. विशेष म्हणजे, हे काम मनरेगाच्या माध्यमातून होणार असल्यामुळे ग्रामीण भागात रोजगाराच्याही संधी निर्माण होणार आहेत. धाराशिव तालुक्यातील सर्व गावांमध्ये ग्रामपंचायत विभाग तसेच कृषी विभागाच्या माध्यमातून ही कामे हाती घेण्यात येणार आहेत. त्यामुळे शेतकरी बांधवांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा,असे आवाहन धाराशिवच्या तहसिलदार डॉ. मृणाल जाधव यांनी केले आहे. या उपक्रमामुळे शेतीसाठी आवश्यक असलेले पाणी साठवता येणार असून, भविष्यकाळात पावसाच्या अनियमिततेवर उपाय म्हणून ही योजना प्रभावी ठरणार आहे. शेतकऱ्यांनी पुढाकार घेऊन आपल्या प्रत्येक एकरात जलतारा तयार करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078

## विविध वृत्त...

### वसुंधरा दिनानिमीत्त उमरगा शहरात तरुणांकडून वृक्षारोपण

आरंभ मराठी । उमरगा

वसुंधरा दिनानिमित्त सन १९९५ भारत विद्यालय उमरगा शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण करून वसुंधरा दिन साजरा केला. येत्या काळात समूहातील प्रत्येक सदस्यांच्या नावाचे किमान एक तरी झाड उमरगा शहरात लावण्याचा मानस समूहाच्या वतीने वसुंधरा दिनानिमित्त करण्यात आला. सध्या कडक उन्हाळा असून शहराचे तापमान ४० अंशाच्या पुढे जात असून याला मोठ्या प्रमाणात होणारी वृक्षतोड जबाबदार आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड होणे गरजेचे झाले आहे. १९९५ समूहाच्या वतीने अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात. कोरोनाच्या काळात शहरातील ईदगाह कोविड सेंटर ला एक महिन्याच्या रात्रीच्या जेवणाची व्यवस्था समूहाच्या वतीने करण्यात आली होती. सध्या प्राथमिक स्वरूपात वृक्षारोपणाची सुरुवात केली असून, येत्या काळात मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणार असल्याची माहिती खाजा मुजावर, शफी चौधरी, सुनील सगर यांनी दिली.



### नारायण राजे गवळी यांच्या स्मरणार्थ तुळजापूर येथे पाणपोई चे उद्घाटन



आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर शहरातील नळदुर्ग रोडवर एसबीआय बँकेसमोर कै. नारायण राजे गवळी यांच्या स्मरणार्थ दरवर्षीप्रमाणे विजय गंगणे मित्र मंडळ व शशी ज्योत यांच्यावतीने नागरिकांसाठी थंड पाण्याच्या पाणपोईचे उद्घाटन माजी नगरसेवक राजेश शिंदे, दयानंद हिबारे यांच्या हस्ते करण्यात आले. या पानपोईवर दर मंगळवारी लिंबू सरबतही वाटप करण्यात येणार आहे. सध्या उन्हाची तीव्रता वाढत असल्याने नागरिकांसाठी थंड पाण्याची पाणपोई तसेच लिंबू सरबतची सोय केल्याने ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. यावेळी माजी सभापती विजय गंगणे, प्रकाश मगर, मनोज गवळी, किरण कदम, अनिल हंगरकर, किरण चव्हाण, अंदेश वाघमारे, दिगंबर जाधव, उत्कर्ष डोंगरे, सुशांत हत्तीकर, आप्पाराव भालेकर, विक्रम मंठाळकर, गोपाळ गवळी आदी उपस्थित होते.

### सुपतगांव येथे माजी विद्यार्थी स्नेहमेळावा उत्साहात; वीस वर्षांनी भेटले वर्गमित्र




आरंभ मराठी । उमरगा

उमरगा तालुक्यातील सुपतगाव येथील भिमराव लामजणे प्रशाला येथील २००५ सालीच्या दहावीतील बॅचच्या विद्यार्थ्यांनी रविवारी (दि.२०) तब्बल २० वर्षांनी हा स्नेह मेळावा घडवून आणला. हा गेट-टुगेदर सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. माजी विद्यार्थ्यांनी गुरुजींना पुष्पांची उधळण करत त्यांना फेटा बांधून शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीशैल तुप्पे यांनी केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी त्यांच्या शालेय जीवनातील व सद्यस्थितील अनुभव व्यक्त केले. तसेच गुरुजींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापक शिवशरण कारभारी, या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पूर्वीचे शिक्षक सिद्धेश्वर वाकडे,सुरेश कांबळे, शाळेतील सहशिक्षक शेखर सगर, महादेव शिदोरे,श्रीशैल तुप्पे,शाळेतील कर्मचारी उमाकांत बिराजदार यांची उपस्थिती होती. तसेच २००५ च्या बॅचमधील शिवराज जगदाळे,मनोहर घोडके,सिध्देश्वर लामजणे,खंडाप्पा जगदाळे,विष्णू कांबळे, मल्लिनाथ कुंभार, मारूती हाक्के, शंकर देवकर, शिवाजी,बेडगे, तानाजी हाक्के, तानाजी कांबळे, शिवशरण बिराजदार नागेश पांचाळ नागेश भालेराव, राजेंद्र माने, परमेश्वर भुजबळ,बालाजी भूजबळ, पांडुरंग सगट,श्रीदेवी लामजणे, अनिता लामजणे, संगिता मुळे,रुपाली लामजणे, श्रीदेवी लामजणे,रमा शिंदे,राणी स्वामी यांच्यासह सर्व मुले-मुली मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहन गुरव तर आभार शिवाजी बेडगे यांनी मानले.

### मागील भांडणाच्या कारणावरून वाद, बिअरच्या बाटलीने मारहाण

आरंभ मराठी । धाराशिव

मागील भांडणाच्या कारणावरून वाद होऊन धाराशिव शहरात दोघांनी एकाला बिअरच्या बाटलीने मारहाण केल्याची घटना घडली. यातील आरोपी शांताराम नंदु लोंढे आणि रोहीत गायकवाड (दोघे रा. धाराशिव) यांनी दिनांक २० एप्रिल रोजी रात्री दहा वाजता छायादिप लॉन्सच्या आवारात धाराशिव येथे फिर्यादी सागर संतोष आरण (वय १९ वर्षे, रा. बिलाल नगर धाराशिव) याला मागील भांडणाच्या कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, काचेच्या बिअरच्या बाटलीने मारहाण करुन जखमी केले. तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिली. शांताराम लोंढे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ११८(१),११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# पुस्तकरूपी परिसाचा स्पर्शच आयुष्याचे सोने करेल



## जागतिक पुस्तक दिनानिमित्त कवी आणि लेखकांचा वाचन संस्कृती टिकवण्याचा सल्ला

आरंभ मराठी । धाराशिव



जगभरात आज (दि.२३) जागतिक पुस्तक दिन साजरा केला जात आहे. पुस्तके आपल्याला खूप काही शिकवतात. खऱ्या आयुष्यात कस जगायचं, कसं वागायचं हेदेखील अनेकदा पुस्तकेच शिकवतात. पुस्तके ही फक्त वाचण्यापुरती मर्यादित नसतात. तर ती आत्मसात करायची असतात. पुस्तकातील काही अनुभव आपल्याला खऱ्या आयुष्यात खूप काही शिकवतात. त्यामुळे लहानांपासून ते अगदी मोठ्या व्यक्तीपर्यंत प्रत्येकालाच पुस्तके खूप काही शिकवतात. पुस्तकांबद्दल लोकांची आवड वाढावी, लोकांनी जास्तीत जास्त पुस्तके वाचावीत आणि लेखकांना सन्मान मिळावा या उद्देशाने जागतिक पुस्तक दिन साजरा केला जातो. हल्ली सोशल मीडियाच्या मायाजालात वाचन संस्कृती लोप पावत असल्याचे चित्र सर्वत्र दिसते. हीच वाचन संस्कृती रुजावी यासाठी धाराशिव जिल्ह्यातील कवी आणि लेखक तिमिरातुनी तेजाकडे नेणाऱ्या पुस्तकांकडे वळण्याचा सल्ला तरुणांना देत आहेत.

### मनाची आणि मेंदूची मशागत करणारी पुस्तकेच खरे मित्र

जागतिक पुस्तक दिनाच्या सर्व वाचक रसिक मित्रांना हार्दिक शुभेच्छा! ग्लोबलायझेशनच्या काळात माणूस तंत्रज्ञानाच्या आहारी गेलेला आहे. त्यामुळे



दिवसेंदिवस तो पुस्तकापासून दूर होत चालला आहे. खरंतर माणसाच्या मनाची व मेंदूची मशागत करणारे महत्त्वाचे दस्तऐवज म्हणून पुस्तकाकडे पाहिले जाते. परंतु, आजच्या काळात तंत्रज्ञानाच्या आणि समाज माध्यमाच्या आहारी गेलेला माणूस प्रत्यक्ष पुस्तकाला हात लावत नाही. अनेक लोक ऑडिओ स्वरूपातील पुस्तकं वाचतात परंतु ते वाचन हे मूलभूत वाचन ठरत नाही. त्यामुळे वाचनमूल्य रुजवली जात नाहीत. म्हणून पुस्तक हेच वाचनासाठीचा एकमेव पर्याय आहे. त्यामुळे पुस्तकाकडे वळणे, पुस्तकाशी मैत्री करणे हीच काळाची गरज आहे. चला पुस्तकांशी मैत्री करूया आणि स्वतः ला समृद्ध करून घेऊन या.

**– प्रा डॉ अरविंद विजय हंगरगेकर**
**मराठी विभाग,**
**रा. प. महाविद्यालय, धाराशिव.**

### स्वयंस्फूर्तीने वाचन प्रेरणा जागृत करणे गरजेचे

मोबाईल मोहिनीत गुर्फटलेल्या विद्यमानात वाचन चळवळ कुठेतरी हरवलेली दिसत आहे.



पारदर्शक संदर्भांचे वाचन होणे आवश्यक आहे. कुठले तरी, काहीतरी कॉपीपेस्ट वाचून आम्ही ज्ञानी झालो आहोत, या गैरसमजात बहुतांश युवा वावरत आहेत. वाचाळ पद्धतीने व्यक्त होणारांची संख्या देखील वाढते आहे. यामुळे सामाजिक स्वास्थ्य देखील प्रसंगी धोक्यात येत असल्याचे दिसून येत आहे.

येणाऱ्या काळात विद्यार्थ्यांसह पालक आणि गुरुजन यांनी स्वयंस्फूर्तीने वाचनाचे महत्व समजून घेणे अपेक्षित आहे. आपल्या ज्ञानकक्षा रुंदावण्यासाठी वाचनाचा पर्याय सहज उपलब्ध आहे. त्यामुळे वाचाल तर वाचाल हे पुन्हा पुन्हा सांगावेसे वाटते.

**– आनंद वीर**
**कवी.**

### पुस्तकेच असतात जीवन घडवणारे दीपस्तंभ

पुस्तकं माणसाचं जीवन समृद्ध करतात. पुस्तकाच्या वाचनाने माणसाच्या मनाच्या व ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात. आयुष्यात भेटलेली चांगली माणसे



आणि वाचलेली चांगली पुस्तके आपल्याला जीवनात योग्य मार्ग दाखवण्यासाठी व योग्य निर्णय घेण्यासाठी म्हणजेच आपले जीवन घडविण्यासाठी दीपस्तंभ ठरतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले यांचं वाचन अफाट होतं म्हणून ते एवढं महान कार्य करून अनेकांचं जीवन बदलू शकले. कुणीतरी म्हटलं आहे की एका चांगल्या बँकेपेक्षा जास्त संपत्ती एका पुस्तकात असते, ह्या संपत्तीची जाणीव मुलांना करून देणं, त्यांचा मोबाईलचा, टीव्हीचा ओढा कमी करून त्यांना पुस्तकांची गोडी लावणं हे प्रत्येक सुजाण पालकाने लक्षात घेणे गरजेचे आहे.

**–डॉ. रेखा अनिल ढगे**
**कवयित्री.**

### वाचलेले आचरणात आणणे देखील गरजेचे

आपणाला समृद्ध होण्यासाठी वाचन केले पाहिजे. मोबाईलच्या दुनियेत हरवलेला तरुण युवा वर्ग वाचन विसरत चालला आहे. युवा पिढी वाचनाकडे



वळलीच नाही तर त्यांच्यावर संस्कार कसे होणार ? संतांनी व साहित्यिकांनी आपणासाठी ज्ञानाचे भांडार निर्माण केलेले आहे त्यांचे वाचन करणे गरजेचे आहे. नुसते वाचन करून चालणार नाही ते आचरणात आणावे लागेल. वाचनाने मस्तक सुधारते आणि सुधारलेले मस्तक कोणासमोर नतमस्तक होत नाही. साहित्यिकांनीही फक्त पुस्तक लिहून चालणार नाही तर वाचन संस्कृती कशी टिकेल ह्याकडे गांभिर्याने लक्ष दिले पाहिजे. जर वाचक वर्गच लोप पावत चालला तर साहित्यिकांच्या विचारांना, त्यांच्या शब्दांना अर्थच राहणार नाही . वाचनाचे छोटे – छोटे उपक्रम घेऊन वाचना बाबत जनजागृता केली पाहिजे. चला, पुस्तकाला आपला मित्र बनवूया, आयुष्यभर त्यांच्या सोबत राहून जीवन सुंदर बनवूया !

**–कविता पुदाले**
**कवयित्री, नळदुर्ग.**

### पुस्तक वाचण्याचं सुख कशातच नाही

मी आणि माझी भावंड हा विषय जितका आपल्यासाठी जिव्हाळ्याचा असतो तितकाच मला ''मी आणि पुस्तक'' ! हा विषय जिव्हाळ्याचा वाटतो.



पुस्तकांचा लळा लागला की, आपल्या काळजाचा मळा हिरवागार होतो. याचा अनुभव मी प्रत्येक दिवशी घेते. कधी कधी तर मला हे आयुष्य कमी पडते की काय ? असे सारखे वाटायला लागते. जग कितीही ऑनलाइन होऊ दे. पण पुस्तक वाचण्यासारखं सुख कशातच नाही. एका प्रामाणिक मित्राचे काम हे पुस्तक करत असतात. योग्य दिशा दाखवण्याचे कामही पुस्तके नेहमीच करतात. आपल्या आयुष्यात आलेल्या दुःखद प्रसंगाला, आपल्या एकांताला दूर करण्याच सामर्थ्य पुस्तकात आहे. वाचण्याचं माध्यम कुठलंही असू देत पण पुस्तकाची सर कशालाही येत नाही हे तितकच खरं आहे. म्हणून वाचा, वाचत राहा.

**–प्रा सुनीता गुंजाळ-कवडे**
**कवयित्री, धाराशिव.**

### बाल साहित्यापासून आवड निर्माण करावी

सध्या मोबाईलच्या जगात वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे असे वाटत असले तरी हे विधान पूर्णतः सत्य नाही. आजही बहुसंख्येने वाचकवर्ग



आहे. मुलांचा वयोगट, आवड, भावविश्व लक्षात घेऊन त्यांना छान-छान पुस्तके वाचायला दिली तर मुले खूप आवडीने वाचतात. मुले पुस्तके स्वतः हून वाचायला मागतात. मी जि.प.प्रा.शाळा सातेफळ ता.कळंब या ठिकाणी सेवेत आहे. माझ्या शाळेतील सहावी व सातवीतील नव्वद टक्के विद्यार्थ्यांनी वर्षभरात ५० ते ६० छोटी-छोटी पुस्तके वाचली आहेत. शासनाच्या महावाचन उत्सवामध्ये शाळेतील शंभर टक्के विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लावण्यासाठी डॉ.सुरेश सावंत, एकनाथ आव्हाड, उत्तम कोळगावकर, आबासाहेब घावटे, बालाजी इंगळे, फारूक काझी, समाधान शिकेतोड अशा बाल साहित्यिकांची पुस्तके वाचायला मिळाली तर मुलांमध्ये वाचनाची प्रचंड आवड निर्माण होईल.

**–संजय लिंबराज धोंगडे, शिक्षक, कवी, सातेफळ, कळंब.**

## मराविमं अधिकारी संघटनेचे ४७ वे राज्यव्यापी अधिवेशन कोल्हापूरला

आरंभ मराठी । लातूर

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या अधिकारी संघटनेचे ४७ वे राज्यव्यापी अधिवेशन २६ व २७ एप्रिल रोजी कोल्हापुरातील द फर्न हॉटेलमध्ये आयोजित केले असून, महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून या अधिवेशनास महावितरण, महापारेषण, महानिर्मिती आणि सूत्रधारी कंपनीतील वर्ग १ आणि वर्ग २ चे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

कोल्हापूरचे खासदार श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांच्या हस्ते उद्घाटन होणाऱ्या या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे राहणार आहेत. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून महावितरणचे संचालक (संचालन/मानव संसाधन) अरविंद भादिकर, महापारेषणचे प्रभारी संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे, महावितरणचे प्रादेशिक संचालक (पुणे) भुजंग खंदारे, प्रभारी कार्यकारी संचालक (मानव संसाधन) व प्रादेशिक संचालक (नागपूर) परेश भागवत, महानिर्मितीचे प्रभारी कार्यकारी संचालक (मानव संसाधन) नितीन वाघ, महावितरणच्या कोल्हापूर परिमंडलाचे मुख्य अभियंता स्वप्नील काटकर हे उपस्थित राहणार आहेत.

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड ऑफिसर्स असोसिएशन ही महाराष्ट्रातील वीज क्षेत्रातील अग्रगण्य शासकीय कंपन्यांतील वित्त व लेखा, मानव संसाधन, औद्योगिक संबंध, माहिती व तंत्रज्ञान, सुरक्षा व अंमलबजावणी, जनसंपर्क व विधी विभागातील अतांत्रिक अधिकाऱ्यांचे नेतृत्त्व करणारी एकमेव बलाढ्य संघटना आहे. संघटनेच्या राज्यव्यापी वार्षिक ४७ व्या अधिवेशनात ऊर्जा क्षेत्रातील तिन्ही कंपन्यांची सद्यस्थिती, खासगीकरण व वीज उद्योग आर्थिक सक्षमीकरण, अतांत्रिक अधिकाऱ्यांची सरळसेवा भरती, पदोन्नती, मनुष्यबळ पुनर्रचना यावर विचार मंथन होणार असल्याने हे अधिवेशन महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती या तिन्ही कंपन्यांच्या वाटचालीत दिशादर्शक ठरेल, असा विश्वास संघटनेचे अध्यक्ष दिनेश लडकत, सरचिटणीस संजय खाडे, संघटन सचिव विजय गुळदगड आणि केंद्रीय कार्यकारिणीने व्यक्त केला आहे.

हे अधिवेशन यशस्वी करण्यासाठी अधिकारी संघटनेच्या कोल्हापूर कार्यकारिणीचे अध्यक्ष अप्पासाहेब पाटील, सचिव श्रीकांत सनगर, शशिकांत पाटील, शंकर सावंत, विनोद खोत, अविनाश कर्णिक, महेश साळुंखे, प्रकाश शिंदे, सारंगधर कळसकर, विश्वजित भोसले यासह कोल्हापूर परिमंडल कार्यकारिणीचे सर्व सभासद परिश्रम घेत आहेत. कोल्हापूर या ऐतिहासिक नगरीत होणाऱ्या ४७ व्या वार्षिक अधिवेशनास सर्व सभासदांनी, पदाधिकाऱ्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संघटनेचे सरचिटणीस संजय खाडे यांनी केले आहे.

## पैलवानांसाठी बांधण्यात आलेल्या तालमीचे रणजित पाटील यांच्या हस्ते उद्घाटन



आरंभ मराठी । परंडा

परंडा तालुक्यातील कौडगाव येथे स्थानिक खासदार निधीतून बांधण्यात आलेल्या पैलवानांसाठीच्या तालमीचे उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख तथा दिशा समितीचे सदस्य रणजित ज्ञानेश्वर पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले.

या प्रसंगी तालुका प्रमुख मेघराज पाटील, वस्ताद प्रकाश ठवरे, ज्येष्ठ नेते आण्णासाहेब तरंगे, सरपंच तुकाराम हजारे, उपसरपंच आरुण पाडूळे,बाळु शिंदे, गरड सर, सुखदेव कारंडे, वैजिनाथ तरंगे, आप्पासाहेब तरटे, श्रीमंत शेळके, मनोज पाडळे, योगेश पाडूळे, प्रदीप कोळेकर, आप्पासाहेब मदने, पांडूरंग शेळके, सुनिल वायकुळे, बजरंग शिरगीरे, नितीन घोगरे, भैरवनाथ हजारे, श्रीमंत ठवरे, पै. विश्वजीत माने, नागेश भिसे, शिवदास ठवरे, केशव काशिद, महावीर मदने, आकु कोळेकर, बंटी गुळमिरे, प्रशांत गायकवाड, बुद्धीवान लटके, विजय खरसडे, ज्ञानेश्वर काशिद, संतोष ठवरे, श्रीराम ठवरे, बिरा पांढरे, बप्पा पांढरे, पांडूरंग कोळेकर, संजय चोपडे व सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कळंब तालुक्यातील अंगणवाडी, मदतनिस भरती प्रक्रिया स्थगित करण्याची मागणी

आरंभ मराठी । शिराढोण

कळंब तालूक्यातील पिंपरी (शि.) येथील प्रियंका राजकुमार माळी यांनी अंगणवाडी मदतनिस भरती निवड प्रक्रीयेवर आक्षेप घेत ही भरती प्रक्रीया स्थगीत करावी अशी मागणी जिल्हाधिकारी यांना निवेदन देवून केली आहे. त्यांनी या निवेदनात अंगणवाडी मदतनिस निवड प्रक्रिया २०२५ यामध्ये अपात्र उमेदवारांना पात्र केल्याचा आरोप केला आहे.

या निवेदनात त्यांनी आक्षेपाचा उल्लेख करत नोटीस बोर्डवर लावलेल्या यादी मध्ये जन्मतारखेत बदल, निवड झालेल्या उमेदवाराच्या जात प्रवर्गात बदल, पात्र केलेला उमेदवार गावातील रहिवासी नसल्याने नियमानुसार अटींची पुर्तता केली नसल्याचे निवेदनात म्हंटले आहे. प्रियंका माळी यांनी सदरील निवड प्रक्रीयेवर आक्षेप नोंदवल्यानंतरही त्यांच्या आक्षेपावर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नसल्याचेही त्यांनी निवेदनात म्हंटले आहे. तसेच गावातील ग्रामपंचायत समोरील नोटीस बोर्डवरील प्रकाशीत केलेल्या नोटीसवर आक्षेप घेण्याच्या अंतिम तारखेचा उल्लेख नसल्याचेही त्यांनी सांगितले आहे. त्यामुळे सदरील भरती प्रक्रियेची चौकशी करण्यात यावी व तुर्तास ही प्रक्रीया स्थगित करावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

### भरती प्रक्रिया पारदर्शक

सदरील भरती प्रक्रीया ही संपूर्णपणे पारदर्शक झालेली आहे. पात्र उमेदवार ही विधवा महिला असून त्यांचे तहसिल कार्यालयाचे रहिवाशी तसेच इतर कागदपत्रांची तपासणी केल्यानंतरच उमेदवाराचे नाव हे पात्र यादीत समाविष्ट करण्यात आले आहे. ज्या उमेदवारांना यामध्ये काही आक्षेप होते त्यासाठीही आक्षेप नोंदवण्यासाठी कालावाधी दिला होता.

**– ताई बोराडे,**
**प्रभारी बालविकास प्रकल्प अधिकारी, कळंब.**

## वाहतूक शाखेकडून २७५ कारवाया

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर सोमवारी (दि.२१) मोटार वाहन कायदा- नियम भंग प्रकरणी एकुण २७५ कारवाया करुन २,३७,३५० रुपये 'तडजोड शुल्क'वसुल केले. वाहतूक शाखेकडून नियमभंग प्रकरणी सक्तीने कारवाया केल्या जात आहेत. गाडीची कागदपत्रे नसणे, लायसन नसणे, ट्रिपल सीट प्रवास करणे तसेच रस्त्यात गाड्या लावून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहन चालकांवर वाहतूक पोलीस कारवाया करत आहेत.

## छत्रपती संभाजी महाराज सार्वजनिक जयंती महोत्सवाची बैठक उत्साहात

आरंभ मराठी । धाराशिव

छत्रपती संभाजी महाराज सार्वजनिक जयंती महोत्सव समितीतर्फे साईलीला हॉटेल राजासाब येथे मंगळवारी (दि.२२) बैठक पार पडली. या बैठकीत जयंती उत्सवातील पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करून शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच विविध समाजोपयोगी उपक्रमांनी छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी करण्याचे निश्चित करण्यात आले.



यावेळी उत्सव अध्यक्ष म्हणून अमोल बाळासाहेब पाटील यांची उपाध्यक्ष म्हणून रोहण आप्पासाहेब धावारे तर मिरवणूक प्रमुख म्हणून आकाश राम साहाणे यांची निवड जाहीर करण्यात आली. तसेच सचिव म्हणून अमर दिलीप घोडके, सहसचिव म्हणून यासिर अखिल बिराजदार, सौदागर कृष्णा गौड आणि प्रशांत महादेव कदम यांची निवड केली. यावेळी कार्यअध्यक्ष म्हणून गणेश नंदकुमार मुंडे, कोषाअध्यक्ष ॲड. धैर्यशील सस्ते, सह कोषाअध्यक्ष अमर प्रमोद घोगरे, सोशल मिडीया प्रमुख सुनिल बाळासाहेब कुंभार यांची निवड जाहीर करण्यात आली. सदस्य कार्यकारणीमध्ये अमोल राजेनिंबाळकर, आकाश मुंडे, अक्षय नाईकवाडी, प्रशांत सांवत, रणजित बनसोडे, मुकुद घाडगे, संकेत सुर्यवंशी, रोहित पडवळ, महेश इंगळे, बलराज रणदिवे, तानाजी चौधरी, गणेश सांळूके, घनशाम रेतापुरे, अमोल जाधव, नितीन मुंडे, प्रशांत पवार, रवि चव्हान, रवि कांबळे, बाळासाहेब वाघमारे, गजानन माने, सुरज मसे, नरसिंह माने, अतुल गायकवाड, महेश रगदळ, प्रवीण खंदारे, आकाश खिलारे, अमरदीप लोखंडे, श्रीकांत साळुंखे, सागर साळुंखे, तेजस ढोकर, रमेश पाटील यांची निवड करण्यात आली आहे.या बैठकीला युवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्यात शाळा प्रवेश नोंदणीची लगबग सुरु



## ■ पटसंख्या वाढवण्यासाठी विविध उपक्रमांसह सोशल मीडियाचा वापर
## ■ गुढीपाडवा प्रवेश वाढवा उपक्रमामुळे जिल्हा परिषद शाळांना पालकांची पसंती

आरंभ मराठी । धाराशिव

**एकीकडे शैक्षणिक वर्ष संपत असतानाच शिक्षकांसह प्रशासनाने नवीन विद्यार्थी प्रवाशांचे नियोजन सुरू केलेले आहे. नवीन शैक्षणिक वर्षातील प्रवेशांची लगबग शाळास्तरांवर सुरु झाली आहे. शाळेच्या पटसंख्या वाढीसाठी शिक्षकांची कसरत सुरु आहे. बालवाडी ते दहावीपर्यंतच्या प्रवेश नोंदणीसाठी विद्यार्थी व पालकांना आकर्षित करण्यासाठी जाहिरातबाजी केली जात आहे. काही खाजगी शाळांमध्ये ग्रुप ॲडमिशनवर फीसवलतीसह विविध ऑफर्स ही ठेवण्यात आल्या आहेत. सोशल मीडियातून विद्यार्थ्यांचे प्रवेश वाढवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. तसेच जिल्हा परिषद शाळांमध्ये गुढीपाडवा प्रवेश वाढवा सारखे स्तुत्य उपक्रम राबविण्यात आले आहेत. अशा विविध उपक्रमांतून नवीन विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश घेण्यासाठी आकर्षिक केले जात आहे.**

काळानुसार शिक्षण क्षेत्रातही बदल होत आहेत. नवीन बदल आत्मसात करत पुढे जाण्याला शाळा व्यवस्थापनांकडून प्राधान्य दिले जात आहे. शैक्षणिक संस्था व शाळांची संख्या वाढत असल्याने खाजगी शाळांसह जिल्हा परिषदेच्या शाळांनादेखील विद्यार्थी प्रवेशासाठी स्पर्धा वाढली आहे. त्यामुळे संचमान्यतेसह शिक्षकांचे समायोजन थांबवण्यासाठी विद्यार्थी पटसंख्या कायम राखण्यासाठी शिक्षकांना कसरत करावी लागत आहे. या पार्श्वभूमीवर बहुतांश खाजगी शाळांमध्ये प्रवेश नोंदणी सुरु झाली आहे. सध्या शाळांस्तरावर वार्षिक परीक्षा सुरु आहेत. आपल्या शाळेत जास्तीत जास्त प्रवेश नोंदणी कशी होईल यावर सर्वच शाळांकडून भर दिला जात आहे. प्रवेश व पट वाढीसाठी विविध फंडे अजमावले जात आहेत. त्यासाठी शाळेतील सोयी सुविधा, राबवण्यात येणारे उपक्रम, मार्गदर्शन वर्ग, कार्यशाळा, यशस्वी विद्यार्थ्यांची माहिती आदिंची जोरदार जाहिरातबाजी केली जात आहे. तसेच एकत्रित प्रवेश किंवा एकाच कुटुंब, नात्यातील पालकांनी एकाच वेळी पाल्याचा प्रवेश घेतल्यास वार्षिक वर्गणीमध्ये सवलत यांसारख्या ऑफरही दिल्या जात आहेत. पालकांचे मतपरिवर्तन करुन आपलीच शाळा कशी सरस आहे, यासाठी शिक्षक वर्गाची धडपड सुरु आहे. चालू कामकाज सांभाळत प्रवेश शैक्षणिक नोंदणीचे वर्षातील काम करताना शाळा व्यवस्थापनासह शिक्षकांची तारेवरची कसरत सुरु आहे.




### पालकांना फी वाढीचा दणका

वाढत्या महागाईबरोबर शैक्षणिक खर्चही वाढला आहे. त्यामुळे शाळांच्या फीदेखील भरमसाठ वाढत आहेत. त्यामुळे पालकांचे आर्थिक गणित कोलमडत आहे. मात्र स्पर्धेच्या युगात आपला पाल्य मागे पडायला नको, याची काळजीदेखील पालकांकडून घेतली जात आहे, त्यामुळे शाळा प्रवेशावेळी पालकांकडून शाळेची शैक्षणिक गुणवत्ता पडताळली जात आहे. शैक्षणिक दर्जा व फीचा समतोल राखला जातोय का, याचाही विचार पालकांकडून केला जात आहे. यावर्षी अनेक शाळांनी फी मध्ये वाढ केल्यामुळे पालकांचा खर्च वाढला आहे.

### पाल्याचा प्रवेश आणि पालकांची प्रतिष्ठा

नामांकित शाळेत पाल्याचा प्रवेश मिळणे म्हणजे पालकांसाठी प्रतिष्ठेचा विषय ठरत आहे. त्यामुळे पाल्याच्या प्रवेशासाठी पालकांची कसरत सुरु झाली आहे. ठराविक शाळांसाठी पालक आग्रही राहत असल्याने काही शाळांकडे गर्दी तर काही शाळांकडे पाठ असा विरोधाभासही जाणवत आहे. गर्दीच्या पाठीमागे जाण्याची मानसिकता प्रवेश प्रक्रियेतील आव्हान ठरत आहे. आपला पाल्य कोणत्या शाळेत शिकतो हे पालकांसाठी प्रतिष्ठेचे लक्षण सध्या समजले जात आहे.

### गुढीपाडवा प्रवेश वाढवा उपक्रमाचा जिल्हा परिषद शाळांना फायदा

यावर्षी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांनी गुढीपाडवा प्रवेश वाढवा सारखे उपक्रम ग्रामीण भागात राबवले. गावोगावी नवीन विद्यार्थ्यांच्या शाळा प्रवेशासाठी राबवलेल्या या उपक्रमाचा प्रवेश वाढीसाठी मोठा फायदा झाला. गावोगावी प्रवेश दिंडी घेऊन शिक्षकांनी जिल्हा परिषद शाळेतच विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा यासाठी प्रयत्न केले. नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शाळांमध्ये धुमधडाक्यात स्वागत देखील करण्यात आले. त्यामुळे यावर्षी धाराशिव जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेश वाढल्याचे चित्र दिसत आहे.

# ग्रामदैवत सद्‌गुरू आगजप्पा देवस्थान मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

आरंभ मराठी । उमरगा

महाराष्ट्र-कर्नाटक राज्याच्या सीमेवर असलेले उमरगा तालुक्यातील कराळी येथील डोंगर माथ्यावरील आगजप्पा देवस्थान. सद्‌गुरू काशिनाथ महाराज अचलबेट देवस्थानच्या सान्निध्यात असलेले तालुक्यातील सीमावर्ती भागातील कराळी येथील डोंगर माथ्यावरील सद्‌गुरू उज्वलानंद महाराजांच्या गुरू परंपरेने आशीर्वादाने चालत आलेल्या आगजप्पा मंदिरातील अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात मंगळवारी (ता.२२) करण्यात आली. यंदा जगद्‌गुरू संत तुकाराम महाराज त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी वर्ष असल्याने विशेष कार्यक्रम होणार आहेत. दरवर्षी आगजप्पा मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह निमित्त विविध कार्यक्रम होतील. दररोज पहाटे ४ ते ६ काकडा, सकाळी ७ ते ११ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, ११ ते १२ गाथा भजन, दुपारी १२ ते १ महाप्रसाद, १ ते ३ महिला भजनी मंडळ, दुपारी ४ ते ५ प्रवचन, संध्याकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्री ८ ते १० कीर्तन, त्यानंतर महाप्रसाद व रात्री १२ ते पहाटे ४ हरिजागर असे कार्यक्रम होणार आहेत. मंगळवारी (ता. २२) दीपक महाराज यांची किर्तनसेवा संपन्न झाली. बुधवारी (२३) सत्यवान महाराज, गुरुवारी (ता. २४) महंत भगवान महाराज शास्त्री, शुक्रवारी (ता. २५) अचलबेट देवस्थानचे हरी लवटे गुरुजी, शनिवारी (ता. २६) परमहंस गुरूवर्य गोरक्षनाथ बाबा, रविवारी (ता २७) गुरूवर्य महंत १००८ अवधूत पुरी यांचे कीर्तन होणार आहे, तर सोमवारी (ता. २८) सद्‌गुरू आगजाप्पा महाराज अग्निबेट देवस्थानचे महंत तेजसनाथ महाराजांचे दुपारी ३ ते साडेपाच दरम्यान काल्याचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता होईल. अशी माहिती सद्‌गुरू आगजाप्पा महाराज अग्निबेट देवस्थानचे महंत तेजसनाथ महाराज यांनी दिली.





# पुरस्कार प्राप्त शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नासाठी काम करणार



### आमदार प्रवीण स्वामी यांची ग्वाही

आरंभ मराठी । उमरगा

राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करणार असल्याचे उमरगा -लोहारा मतदारसंघाचे आमदार प्रवीण स्वामी यांनी म्हटले आहे. ते उमरगा येथे राज्य, राष्ट्रीय शिक्षकांच्यावतीने आयोजित केलेल्या सत्कार समारंभ प्रसंगी बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कमलाकर मोटे हे होते. पुढे बोलताना आ.स्वामी यांनी राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांच्या कांही प्रलंबित असलेल्या मागण्यासोबतच एकूणच सर्व शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासोबतच शिक्षकांवर लादण्यात आलेले शालाबाह्य कामे करून त्यांना शिकविण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल आणि शिक्षक तणावमुक्त राहिल यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. याप्रसंगी आ.प्रवीण स्वामी यांचा संघटनेच्या वतीने सपत्नीक सत्कार विठ्ठल सहकारी पतसंस्था धाराशिवचे संस्थापक अध्यक्ष विक्रम (भैय्या )पाटील, गटशिक्षणाधिकारी काकासाहेब साळुंके यांच्या उपस्थितीत करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप चौधरी यांनी केले. मानपत्राचे वाचन भैरवनाथ कानडे यांनी केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीम.सरिता उपासे यांनी केले. याप्रसंगी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या ग्रंथालय उपक्रमांतर्गत पुस्तके प्रकाशित झालेले राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक डॉ.बालाजी इंगळे, भैरवनाथ कानडे यांचा व व्हिडिओ निर्मितीत यश प्राप्त केल्याबद्दल बळीराजा घोरवडे यांचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर सेवानिवृत्त झालेले राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक कमलाकर मोटे, सुनील पुजारी यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी पुरस्कार प्राप्त शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोविड अनुदान, वेतन वेळेत अदा केल्याबद्दल जिल्हा कोषागार अधिकाऱ्यांचा सत्कार



आरंभ मराठी । धाराशिव

कोविड काळात कर्तव्यावर असताना मृत्यू पावलेले शिक्षक स्वर्गीय राहुल गायकवाड यांचे कोविड सानुग्रह अनुदान प्राप्त झाल्यानंतर एका क्षणात त्याचे वितरण केल्याबद्दल आणि मार्च २०२५ चे वेतन सलग सुट्यांपूर्वी होण्यासाठी कार्यालयीन वेळेनंतरही दीर्घकाळ थांबून वेतन अदा करूनच कार्यालय सोडलेल्या, गुड गव्हर्नन्स प्रत्यक्षात राबविणाऱ्या, कर्तव्यदक्ष व कार्यतत्पर जिल्हा कोषागार अधिकारी अर्चना नरवडे यांचा शिक्षक समितीच्या वतीने गौरव करण्यात आला. यावेळी समितीचे राज्य कार्यकारणी सदस्य कल्याण बेताळे, जिल्हाध्यक्ष रमेश बारसकर, उपाध्यक्ष भैरवनाथ झांबरे, संपर्कप्रमुख रामभाऊ होरे, कायदेशीर सल्लागार राहुल अपसिंगकर आदी उपस्थित होते.

# तुळजापूर येथील नवोदय विद्यालयात वसुंधरा दिन विविध उपक्रमांनी साजरा

आरंभ मराठी । तुळजापूर

पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय तुळजापूर येथे २२ एप्रिल हा दिवस जागतिक वसुंधरा दिन म्हणून साजरा करण्यात आला.


सर्वप्रथम समाजशास्त्राचे अध्यापक चक्रपाणि गोमारे यांनी या कार्यक्रमाची प्रस्तावना करत असताना २२ एप्रिल या दिवसाची जागतिक वसुंधरा दिन म्हणून का निवड केली? केव्हापासून सुरुवात करण्यात आली हे सांगून सध्याच्या काळात हा दिवस का साजरा करण्याची का आवश्यकता आहे. यासंदर्भात प्रस्तावना केली. त्यानंतर डॉ. शंकर नारायण यांनी वसुंधरा दिवसाचे महत्त्व सांगत असताना वाढते काँक्रिटीकरण आणि जलसंवर्धनाच्या अभावामुळे सध्या पाण्याची समस्या कशी गंभीर बनत चालली आहे. ही समस्या सोडवण्यासाठी वसुंधरेचे संवर्धन करणविषयी आपले विचार व्यक्त केले. तसेच डी एस देशमुख व प्रभारी प्राचार्य एस डी खोब्रागडे यांनीही निसर्गाचे संवर्धन न केल्यामुळे सध्या तापमान कसे वाढत आहे आणि त्याचा आरोग्यावरती कसा परिणाम होत आहे हे सांगून हा परिणाम टाळण्यासाठी प्रत्येकाने वाढदिवसा दिवशी पाच झाडे लावण्याचा संकल्प करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

शेवटी कार्यक्रमाचे मुख्य अतिथी जवाहर नवोदय विद्यालय सोलापूरचे प्राचार्य संजय कोठाडी म्हणाले की, वसुंधरा दिन केवळ एक दिवस साजरा न करता निसर्ग व पर्यावरण यांचा समतोल साधण्यासाठी झाडे न तोडता उलट झाडांचे तसेच ज्यावरती आपली उपजीविका आधारित आहे अशा भूमातेतील पाण्याचे स्रोत नदी ,विहिरी बंधारे यांचे संरक्षण करून दैनंदिन जीवनामध्ये प्लास्टिकचा वापर न करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन हरी जाधव यांनी केले. यावेळी डी एस देशमुख, चक्रपाणि गोमारे , एस डी खोब्रागडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सी एस गोमारे यांनी केले.

# मोठ्याने का बोलला म्हणत एकाला तिघांकडून साखळीने मारहाण

आरंभ मराठी । लोहारा

मोठ्याने का बोलला म्हणत लोहारा तालुक्यातील कास्ती येथे एका व्यक्तीला तिघांनी लोखंडी साखळीने मारहाण केल्याची घटना घडली. यातील आरोपी जिवन सुभाष राठोड, आकाश बाबुराव राठोड, विशाल तात्याराव राठोड (रा. कास्ती बु. ता. लोहारा) या तिघांनी दिनांक २१ एप्रिल रोजी दुपारी दोन वाजता कास्ती बुद्रुक चौकातील भंडारे यांच्या दुकानाजवळ नितीन माणिक लोभे (वय ३६ वर्षे, रा. नागुर ता.लोहारा) यांना मोठ्याने बोलण्याच्या कारणावरुन शिवीगाळ केली.।तसेच लाथाबुक्यांनी, लोखंडी साखळी व हातातील कढ्याने मारहाण करुन जखमी केले. तसेच फिर्यादीची हिरो होंडा मोटारसायकल रोडवर आदळून नुकसान केले. व जिवे ठार मारण्याची धमकी दिली. नितीन लोभे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन लोहारा पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ११८(१), ११५(२),३२४(४), ३५२, ३५१(२)(३), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.



# तेरणा महाविद्यालयाच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागात नोकरीसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

आरंभ मराठी । धाराशिव

तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागात एक्सपर्ट टॉकचे आयोजन केले होते. यावेळी क्रायसलिस करिअर इंटरप्रीनवरशिप स्किल पुण्याचे संचालक आणि तज्ञ मार्गदर्शक राजेंद्र कोरे हे मार्गदर्शन करण्यासाठी आले होते. यावेळी बोलताना राजेंद्र कोरे म्हणाले की, नोकर भरती संदर्भात मेकॅनिकल इंजिनिअरिंग साठी अनेक संधी असून, बदलत्या काळाबरोबर विद्यार्थ्यांनी चालल्यानंतर नेमक्या संधी कोणत्या हे सहज लक्षात येते. सध्याची नवीन नौकर भरती ही ए आय मार्फत अर्थात आरटीफिशियल इंटेलिजन्स च्या माध्यमातून होत असल्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वतःमधील स्किल सेट हा विकसित केला पाहिजे. नवनवीन तंत्रज्ञानाला अवगत करून नोकरीमध्ये ज्या संधी आहेत त्या शोधण्यापेक्षा त्या संधीच तुमच्याकडे सहज उपलब्ध होतात. पण त्यासाठी स्वतःचा रिजुम वेळोवेळी अपडेट करता आला पाहिजे. अशा अद्ययावत विद्यार्थ्याला कंपन्या स्वतः शोधत येतात. या एक्स्पर्ट टॉक साठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विक्रमसिंह माने , महाविद्यालयाचे अकॅडमिक डीन आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग चे विभाग प्रमुख डॉ.डी डी दाते , महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. अशोक जगताप ,विभागाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा आर ए दंडनाईक यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने म्हणाले की, महाविद्यालय सतत विद्यार्थ्यांना पदवी बरोबरच विविध कोर्सेसच्या माध्यमातून त्यांच्या मधील कौशल्य विकसित करण्याचा प्रयत्न करत असते.

यावेळी मेकॅनिकल इंजिनिअरिंग चे विभाग प्रमुख डॉ. डी डी दाते म्हणाले की मेकॅनिकल इंजिनिअरिंग ही अभियांत्रिक क्षेत्रातील एक प्रमुख शाखा असून या माध्यमातून विद्यार्थ्यांना कंपनी बरोबरच शासकीय नोकरी मधील सुद्धा अनेक संधी सहज उपलब्ध होत आहेत. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाचे सर्व प्राध्यापक आणि कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.





# भाजपा नळदुर्ग शहराध्यक्षपदी माजी नगरसेवक बसवराज धरणे

आरंभ मराठी । नळदुर्ग

भाजपच्या नळदुर्ग शहराचे अध्यक्ष म्हणुन नळदुर्ग येथील माजी नगरसेवक व युवा नेतृत्व बसवराज धरणे यांची निवड करण्यात आली असुन त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातुन स्वागत होत आहे. बसवराज धरणे यांच्या निवडीने नळदुर्ग शहर व परीसरात भाजपला मोठे बळ मिळणार आहे. २० एप्रिल रोजी तुळजापुर येथे झालेल्या भाजपच्या बैठकीत नळदुर्गचे माजी नगरसेवक बसवराज धरणे यांची भाजपच्या नळदुर्ग शहर तालुक्याचे अध्यक्ष म्हणुन निवड करण्यात आली आहे. आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या आदेशानुसार ही निवड करण्यात आली असुन, भाजपचे युवा नेते सुनिल चव्हाण यांचे कट्टर समर्थक म्हणुन बसवराज धरणे यांची ओळख आहे. नळदुर्ग शहर व परीसरात बसवराज धरणे यांचे राजकारणात वर्चस्व आहे. याचा फायदा भाजपला आगामी काळात होणाऱ्या नगरपालिका, जिल्हा परीषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतच्या निवडणुकीत होणार आहे. बसवराज धरणे हे राजकारणाबरोबरच सामाजिक कार्यातही अग्रेसर आहेत. त्यामुळे त्यांना मानणारा एक मोठा वर्ग या परीसरात आहे. बसवराज धरणे यांची भाजपच्या नळदुर्ग शहर तालुका अध्यक्षपदी निवड झाल्यामुळे नळदुर्ग शहर तसेच परीसरात भाजपची राजकीय ताकद वाढणार आहे. कारण बसवराज धरणे हे राजकारणात कायम सक्रीय असतात. त्यांच्या निवडीमुळे भाजपला बऱ्याच कालावधीनंतर नळदुर्ग शहर व परीसरात एक चांगले नेतृव मिळाले आहे. भाजपच्या नळदुर्ग शहर तालुका अध्यक्षपदी बसवराज धरणे यांची निवड झाल्याबद्दल आमदार राणाजगजितसिंह पाटील, युवा नेते सुनिल चव्हाण व भाजपच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचा सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले आहे.

